# कार्यालय नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (शिक्षण विभाग)

क्र. 1995 / शि.वि./ 2014 दिनांक :– 9/6/2014

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका
सर्व प्राथ. / उच्च प्राथ. / माध्य. शाळा
म.न.पा. नागपूर

**विषय :– 1) पाठयपुस्तके वितरण करण्याबाबत,**
**2) दि. 26.06.2014 हा दिवस 'पुस्तक दिन (Book Day) घोषित करणे**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, शैक्षणिक सत्र 2014–15 करिता सर्व शिक्षा अभियान अंतर्गत इयत्ता 1 ते 8 ची मोफत पाठयपुस्तके उपलब्ध झालेली असून त्याचे वाटप खालील तक्त्यात दर्शविलेल्या माध्यम निहाय वेळापत्रकानुसार संबधित झोनचे शाळा निरिक्षक केंद्र समन्वयक यांच्या मार्फत खालील केंद्रावर करण्यात येत आहे.

परिपत्रकात दिलेल्या वेळापत्रकानुसार, दिलेल्या तारखेनुसार, दिलेल्या केंद्रावर व वेळेवर पुस्तकांची उचल करावी. येतांना मुख्याध्यापकाचा शिक्का व पुस्तके सुरक्षित शाळेत नेण्याकरिता आवश्यक साहित्य सोबत आणावे. पुस्तके उचल करते वेळेस पुस्तकांची संख्या, विषय, माध्यम यांची खात्री करावी. उचल केलेल्या पुस्तकांवर 'सर्व शिक्षा अभियान मोफत पाठयपुस्तक' असा शिक्का तीन जागी मारावा. 1) मुखपृष्ठानंतर पहिल्या पानावर 2) पुस्तकांच्या मधल्या पानावर 3) मलपृष्ठाच्या अगोदरच्या पानावर. हे काम दि. 23.6.2014 पूर्वी होणे आवश्यक आहे.

नविन शैक्षणिक सत्रात शाळा सुरूवातीचा <u>**पहिला दिवस दि. 26.06.2014 हा "पुस्तक दिन" (Book Day)**</u> म्हणून घोषित करून पाठयपुस्तके व स्वाध्याय पुस्तिकांचे वितरण मा. नगरसेवक, शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य, पालक समितीचे सदस्य, माता पालक समितीचे सदस्य यांना निमंत्रण देऊन त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना करावे. वाटपाची नोंद रजिस्टर मध्ये करावी कार्यक्रमाचे फोटो घेण्यात यावे. माहिती वर्तमानपत्रात प्रसिद्धीमाध्यमाद्वारे प्रसिद्ध करावी. व अहवाल कार्यालयास सादर करावा. उपरोक्त सुचनाचे काटेकोरपणे पालन करावे. पुस्तकांची उचल किंवा वाटपात दिरंगाई झाल्यास संबधित शाळेचे मुख्याध्यापक जबाबदार राहतील याची नोंद घ्यावी.

# पाठयपुस्तके वाटप वेळापत्रक

| दिनांक / वार | झोन क्र. | वाटपाची वेळ | माध्यम / शाळा | केंद्र |
|---|---|---|---|---|
| 16.6.2014<br>सोमवार | 1 ते 2<br>3 ते 4 | सकाळी 10 ते 12<br>दुपारी 12 ते 02 | मराठी, माध्यमाच्या सर्व प्राथ. उच्च प्राथ. माध्यमिक शाळा | दुर्गानगर समुह साधन केंद्र म.न.पा. जुना सुभेदार ले आऊट नागपूर |
| 17.6.2013<br>मंगळवार | 5 ते 6<br>7 | सकाळी 10 ते 12<br>दुपारी 12 ते 02 | मराठी, माध्यमाच्या सर्व प्राथ. उच्च प्राथ., माध्य शाळा | दुर्गानगर समुह साधन केंद्र म.न.पा. जुना सुभेदार ले आऊट नागपूर |
| 18.6.2013<br>बुधवार | 8<br>9 ते 10 | सकाळी 10 ते 12<br>दुपारी 12 ते 02 | मराठी, माध्यमाच्या सर्व प्राथ. उच्च प्राथ. माध्यमिक शाळा | दुर्गानगर समुह साधन केंद्र म.न.पा. जुना सुभेदार ले आऊट नागपूर |
| 16.6.2014<br>सोमवार | 1 ते 2<br>3 ते 4 | सकाळी 10 ते 12<br>दुपारी 12 ते 02 | हिंदी माध्यमाच्या सर्व प्राथ., उच्च प्राथ. माध्यमिक शाळा | नवा बगडगंज समुह साधन केंद्र म.न.पा. नागपूर |
| 17.6.2013<br>मंगळवार | 5 ते 6<br>7 | सकाळी 10 ते 12<br>दुपारी 12 ते 02 | हिंदी माध्यमाच्या सर्व प्राथ., उच्च प्राथ. माध्यमिक शाळा | नवा बगडगंज समुह साधन केंद्र म.न.पा. नागपूर |
| 18.6.2013<br>बुधवार | 8<br>9 ते 10 | सकाळी 10 ते 12<br>दुपारी 12 ते 02 | हिंदी माध्यमाच्या सर्व प्राथ., उच्च प्राथ. माध्यमिक शाळा | नवा बगडगंज समुह साधन केंद्र म.न.पा. नागपूर |
| 16.6.2014<br>सोमवार | 1 ते 5<br>6 ते 7 | सकाळी 10 ते 12<br>दुपारी 12 ते 02 | उर्दू, इंग्रजी माध्यमाच्या सर्व प्राथ., उच्च प्राथ. माध्य शाळा | बाळाभाऊपेठ समुह साधन केंद्र म.न.पा. नागपूर |
| 17.6.2013<br>मंगळवार | 8 ते 9 | सकाळी 10 ते 12<br>दुपारी 12 ते 02 | उर्दू, इंग्रजी माध्यमाच्या सर्व प्राथ., उच्च प्राथ. माध्य शाळा | बाळाभाऊपेठ समुह साधन केंद्र म.न.पा. नागपूर |
| 18.6.2013<br>बुधवार | 10 | सकाळी 10 ते 12<br>दुपारी 12 ते 02 | उर्दू, इंग्रजी माध्यमाच्या सर्व प्राथ., उच्च प्राथ. माध्य शाळा | बाळाभाऊपेठ समुह साधन केंद्र म.न.पा. नागपूर |

**टीप :–** नविन शैक्षणिक सत्रांचा शुभारंभ करण्याच्या दृष्टिने व पटनोंदणी राबविण्याच्या दृष्टिने सर्व प्राथमिक, उच्च प्राथमिक शाळा व माध्यमिक शाळा दि.26 / 6 / 2014 पासून सुरू होतील. शाळेत मुख्याध्यापक व सर्व शिक्षक कर्मचारी उपस्थित राहतील याची खबरदारी मुख्याध्यापक यांनी घ्यावी.

for शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपलिका, नागपूर

**प्रतिलीपी,**

1) मा. आयुक्त म.न.पा. नागपूर
2) मा. अपर आयुक्त म.न.पा. नागपूर
3) मा. उपायुक्त म.न.पा. नागपूर
4) शाळा निरिक्षक झोन क्र. 1 ते 10 म.न.पा. नागपूर
5) केंद्र समन्वयक झोन क्र. 1 ते 10 म.न.पा. नागपूर